**MHAH060015982023**

फौजदारी किरकोळ अर्ज.क्र.३७१/२०२३ मधील निशाणी ०५ वरील आदेश

***(त्रिवेणी तेजस नाईक विरूध्द  सुनिता नितीन नाईक व इतर)***

अर्जदाराने मुख्य अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम १२ अन्वये दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज अर्जदाराने सामनेवाला नं.२ यांचेकडून दरमहा रक्कम रु.२५,०००/- अंतरिम पोटगी मिळणेकामी दाखल केलेला आहे.

२. उभय पक्षकार तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. उभयपक्षकार यांची कथने, पटलावर दाखल केलेली कागदपत्रे यावरुन उपस्थित झालेले मुद्दे खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिने सामनेवाला यांनी तिचा सकृतदर्शनी कौंटूबिक हिंसाचार केल्याचे शाबित केले काय ? | होकारार्थी. |
| २. | अर्जदार ही सामनेवाला क्र.२ कडून प्रतिमहा रक्कम रु.२५,०००/- अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | अशंतः होकारार्थी. |
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे... |

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीताः</u>**

३. अर्जदार हिने, सामनेवाला क्र. २ व तिचा विवाह नातेवाईकांच्या मध्यस्तीने दि.०९.१२.२०२२ रोजी झाला. त्याकरीता अर्जदार हिच्या वडीलांनी बराच खर्च करून त्यांचा विवाह थाटामाटात करुन दिला असल्याचे कथन केले.

४. अर्जदार व सामनेवाला क्र.२ यांचा विवाह हिंदू धर्म शास्त्राप्रमाणे दि.०९.१२.२०२२ रोजी झाला असल्याचे व उभयतांमध्ये पती–पत्नीचे नाते वादाथीत नाही.

५. प्रथम अर्जदार हिचा प्राथमिकदृष्टया कौटूंबिक हिंसाचार झाला किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे. त्याकरीता अर्जदार हिने शपथेवर ती सामनेवाला यांचेकडे नांदत असताना सामनेवाला यांनी तिचा शारिरीक व मानसिक छळ केला असल्याबाबत कथन केले आहे. सामनेवाला यांनी अर्जदार हिस लग्नाचे कारणावरुन तिच्याकडे आठ लाख रूपयांची मागणी केली. त्याची पूर्तता झाली नाही म्हणून अर्जदार हिचा छळ केला. सामनेवाला यांनी अर्जदार तसेच तिच्या आई वडीलांना पैश्याच्या कारणावरून बोलून अपमानित केले. तसेच त्यांचेकडून पैश्याची मागणी पूर्ण होत नाही म्हणून नांदविणेस नकार दिला. सामनेवाला हीने अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेवून खोटा बदनामीकारक आरोप केला. तसेच अर्जदार हीस सामनेवाला यांनी नांदविले नाही. अर्जदार हीस कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. याउलट सामनेवाला यास ६०,०००/– रूपये प्रतिमहा पगार मिळतो. तसेच सामनेवाला यांची पुणे शहरात दोन घरे आहेत. सामनेवाला क्र. ३ हा देखील नोकरी करतो. त्यामुळे अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

६. उलटपक्षी, सामनेवाला यांनी हजर होवून त्यांनी मुळ अर्ज व प्रस्तूतचे

अर्जावर निशाणी १७ वर म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी अर्जदार यांचा मुळ अर्ज व प्रस्तूत अर्जातील लग्ना व्यतिरिक्त इतर कथने नाकारली आहेत. त्यांनी अर्जदार यांच्या घरच्यांनी लग्नामध्ये त्यांची सुविधा केली नव्हती, तरीही सामनेवाला यांनी मुलगी चांगली आहे त्यामुळे सर्व सांभाळून घेतले. असे असतांना अर्जदार हीचे आईने लग्नावरून सामनेवाली क्र. १ हीस टोमणे मारले. अर्जदार ही लग्नानंतर बराच वेळ त्रेयस्थ व्यक्तिबरोबर फोनवर बोलत होती. सामनेवाला क्र. २ यांनी तिला समजावून सांगितले होते. असे असतांना अर्जदार ही सारखी चिडचिड करून सामनेवाला यांचा अपमान करत होती. अर्जदार ही शुल्लक गोष्टीवरून सामनेवाला यांचेसोबत वाद करत होती. सामनेवाला अर्जदार हीस हिमाचल प्रदेश येथे विमानाने फिरण्यास घेवून गेला असता, अर्जदार हीने विवाह संबंध प्रस्थापित होवून दिले नाही. सामनेवालाने अर्जदार हीची सर्व हौसमौज केली.

७. दरम्यान, दिनांक ३१.०३.२०२३ रोजी अर्जदार तिच्या भावासोबत बारश्याच्या कार्यक्रमासाठी घेवून गेला, त्यावेळी अर्जदार हीची आई आजारी असल्याचे समजले. त्यावेळी सामनेवाला यांनी तिला अर्जदार हीचे आईस दवाखान्यात घेवून जाण्यास सांगितले. तिच्या आईला दवाखान्यात दाखल केल्यानंतर अर्जदार ही श्रीरामपूरला गेली. सामनेवालाने अर्जदार हीचेकडे तिच्या आईची चौकशी केली असता, तिने तिच्या आईला डेंग्यु झाल्याचे व अहमदनगर येथील दवाखान्यात पाठविल्याचे सांगितले. सामनेवाले त्यांच्या सासूला पाहण्यासाठी अहमदनगर येथे जाण्यास निघाले, त्यावेळी सामनेवाला यांना अर्जदार हीने खोटेनाटे सांगितले. असे असतांना सामनेवालाने तिच्याकडे दुर्लक्ष करून हॉस्पीटलमध्ये गेले. तेथे सामनेवालाशी अर्जदार हीने भांडण करून अपमानित केले. वस्तुतः डॉक्टरांकडे चौकशी करता, अर्जदार हीचे आईचा मृत्यु पांढ–या पेशी कमी झाल्याने झाला होता. असे असतांना अर्जदार हीने जाणीपूर्वक

सामनेवाला यांना त्रास देण्याच्या उद्देशाने त्यांच्या त्रासामुळे तिच्या आईचा मृत्यु झाला असे म्हणून भांड केले.

८. त्यानंतर दिनांक ११.०५.२०२३ रोजी सामनेवाला व अर्जदार यांच्या घरातील लोकांची बैठक झाली. त्यावेळी अर्जदार व तिच्या घरातील लोकांनी सामनेवाला व त्यांच्या घरातील लोकांना दमदाटी व शिवीगाळ केली. त्यावेळी सामनेवाला यांनी अर्जदार हीचे सुशील पवार सोबत प्रेमसंबंध असल्याचे व त्यांचे मॅसेज त्यास मिळाले असल्याचे सांगितले. त्यावेळी अर्जदाराने सामनेवालावर घाणेरडे आरोप करून मारून टाकण्याची धमकी दिली. सामनेवालाने अर्जदाराचा त्याग केलेला नाही. याउलट, अर्जदाराने स्वतःहून सामनेवालाचा त्याग केला आहे. त्यामुळे अर्जदार हीचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

९. उभयपक्षकार तर्फे विधीज्ञ यांनी अर्जतील कथनांप्रमाणे युक्तीवाद केला. सामनेवालातर्फे विधीज्ञ यांनी अर्जदार ही व्याभिचारी जिवन जगत आहे, त्यामुळे तिला पोटगी मिळण्याचा अधिकार नाही, असा युक्तिवाद करून आदरणीय मुंबई उच्च न्यायालय यांचा भागवत पितांबर बोरसे वि. अनुसयाबाई भागवत बोरसे, २०११ एस.टी.पी.एल. ७९३७ बॉम्बे, या न्यायनिवाडयावर आपली भिस्त ठेवली आहे. त्यामुळे आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाने. जर उभय पक्षकारांमधील विवाह व्याभिचाराच्या मुद्यावरून न्यायालयाच्या आदेशाने संपूष्टात आला असेल तर, फौजदारी कायद्यांतर्गत पोटगी मिळण्यास पत्नी पात्र नाही, असे गृहीतक नोंदविलेले आहे.

१०. सामनेवालातर्फे विधीज्ञ यांनी पुढे अर्जदार ही उच्चशिक्षीत असून पूर्वी नोकरी करत होती, त्यामुळे तिला पोटगी मागण्याचा अधिकार नाही, असा युक्तिवाद करून

आदरणीय दिल्ली उच्च न्यायालय यांचा दामनप्रित कौर वि. इंदरमित जुनेजा व इतर, २०१३ एस.टी.पी.एल. ८८२ दिल्ली या न्यायनिवाडयावर आपली भिस्त ठेवली आहे. त्यावरून आदरणीय उच्च न्यायालयाने पत्नी उच्चशिक्षीत असल्यास फक्त पोटगी मिळण्याकरिता तिने सामाजिकदृष्टया घरी बसून राहणे उचित होणार नाही, असे गृहीतक नोंदविले आहे.

११. उलटपक्षी, अर्जदारतर्फे विधीज्ञ यांनी जरी पत्नी उच्चशिक्षीत असेल, तरीही एकमेव त्याच कारणावरून तिला पोटगी देता येणार नाही, असे म्हणता येणार नाही, असा युक्तिवाद करून आदरणीय सर्वोच्च न्यायालय यांचा सुनिता कचवाह व इतर वि. अनिल कचवाह, २०१४ एस.टी.पी.एल. १०७७७ एस.सी. या न्यायनिवाडयावर आपली भिस्त ठेवली आहे. त्यामध्ये आदरणीय सर्वोच्च न्यायालयाने पत्नी उच्चशिक्षत आहे, यावरून जोपर्यंत इतर पुरावा पटलावर येत नाही तोपर्यंत ती स्वतःचा उदरनिर्वाह स्वतः करू शकते असे म्हणता येणार नाही, असे गृहीतक नोंदविले आहे.

१२. अर्जदार व सामनेवाला क्र.२ यांचेमधील पती–पत्नी नाते वादाथीत नाही. त्यामुळे प्रथम सामनेवाला यांनी अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार केला किंवा नाही, हे पाहणे गरजेचे आहे. अर्जदार हीने प्रतिज्ञापत्रावर सामनेवाला यांनी लग्नाचे कारणावरून त्यांच्याकडे आठ लाख रूपये मागणी करून तिचा छळ केल्याचे कथन केले आहे. याउलट सामनेवाला यांनी सदरची कथने नाकारून अर्जदार हीच्यावर व्याभिचारी असल्याचा आरोप केला आहे. त्याकरिता त्यांनी व्हॉट्स ॲप चॅटच्या प्रति दाखल केल्या आहेत. सदर प्रतिवरून त्या कोणाच्या मोबाईलच्या आहेत, तसेच त्या कोणत्या मोबाईल नंबरच्या आहेत, हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे सामनेवाला यांनी अर्जदार हीच्या व्याभिचाराबाबत त्यांच्या कथनाव्यतिरिक्त इतर पुरावा नाही. याउलट, अर्जदार हीने सामनेवाला यांचे चॅटींग

दाखल केले आहे. त्यामध्ये आक्षेपार्य मजकूर नमुद आहे व त्यावर सामनेवाला क्रमांक २ चे नाव नमुद आहे. यावरून सामनेवाला क्र. २ याने सकृतदर्शनी अर्जदार यांच्यावर फक्त आरोप केले असल्याचे दिसून येते.

१३. सामनेवालातर्फे विधीज्ञ यांनी भिस्त् ठेवलेल्या आदरणीय मुंबई उच्च न्यायालय यांचा भागवत बोरसे या न्यायनिवाडयामधील पक्षकारांमध्ये दिवाणी न्यायालयातून व्याभिचाराच्या मुद्दयावर विवाह विच्छेदन झालेला होता. त्यामुळे सदरचे कारण पोटगी ठरवितांना विचारात घेण्यात आलेले आहे. या प्रकरणात दिवाणी न्यायालयातून व्याभिचाराच्या मुद्यावर निर्णय झालेला नाही. त्यामुळे सदर गृहीतक या प्रकरणास लागू होत नाही. त्यामुळे सामनेवाला यांनी अर्जदार हीच्यावर व्याभिचाराचे फक्त आरोप केले असल्याचे दिसून येते. सदर आरोप हे फक्त प्रेम संबंधाबाबत आहेत. त्यामुळे एकमेव सदरचे आरोप सुध्दा अर्जदार हीचा कौटुंबिक हिंसाचार झाला हे सकृतदर्शनी पुरेसे आहेत.

१४ अर्जदार हीने प्रतिज्ञापत्रावर सामनेवाला यांनी तिचा छळ केल्याचे कथन केले आहे. सामनेवालाने अर्जदार हीच्यावर व्याभिचाराचे आरोप केले आहेत. तसेच तिला नांदविलेले नाही. त्यामुळे सामनेवाला यांनी अर्जदार हीचा सकृतदर्शनी कौटुंबिक हिंसाचार केला हे सिध्द होते.

१५. पुढील महत्वाची बाब म्हणजे, उभयपक्षकार यांचे उत्पन्नाचे स्त्रोत व राहणीमानाचा दर्जा व त्यांच्यावर असलेल्या जबाबदा-या याचा विचार करणे गरजेचे आहे. अर्जदार हिने सामनेवाला हा माहिती तंत्रज्ञान कंपनीत नोकरीस असून त्यास प्रतिमहा ६० हजार रुपये उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाला क्र.३ यास ३० हजार रूपये पगार मिळतो.

सामनेवाला यांचे पुणे येथे दोन घरे आहेत. याउलट अर्जदार हिस कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळे प्रतिमहा २५,०००/– पोटगीची मागणी केली.

१६. याउलट, सामनेवाला यांनी अर्जदार ही उच्च शिक्षीत असून पूर्वी नोकरी करत होती. त्यामुळे वर नमुद केलेल्या दामनप्रित कौर या न्यायनिवाडयावर भिस्त ठेवून पोटगी देता येणार नाही, असा युक्तिवाद केला.

१७. उभय पक्षकार यांनी त्यांच्या कथनांमध्ये दोघांच्या शिक्षणाबाबत उल्लेख केलेला नाही. सामनेवाला यांनी त्यांच्या म्हणण्यात अर्जदार हीच्या पुर्वीच्या नोकरीबाबत उल्लेख केलेला नाही. तसेच सामनेवालाने त्याचे प्रतिज्ञापत्र व बँक स्टेटमेन्ट दाखल करून ६० हजार पगार मिळत असल्याबाबत नाकारलेले आहे. परंतु, उभय पक्षकार यांनी संबंधित बँकेकडून व अर्जदार हीच्या पूर्वीच्या शाळेतून नोकरीबाबत साक्षीसमन्स काढून कागदपत्रे दाखल केली आहेत. निर्मलाताई काकडे, आर्ट्स कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, शेवगांव यांच्यातर्फे माहितगार इसमाने दाखल केलेल्या कागदपत्रांवरून अर्जदार ही जानेवारी २०२२ पूर्वी त्यांच्या शाळेत सहा. सहयोगी प्राध्यापक म्हणून काम करत असल्याचे व तिला अंदाजे प्रतिमहा १५०००/– मानधन मिळत असल्याचे दिसून येते. अर्जदार व सामनेवाला क्र.२ यांचे लग्न ०९.१२.२०२२ रोजी झालेले आहे. तिने जानेवारी २०२२ मध्येच राजीनामा दिलेला आहे. त्यामुळे अर्जदार ही लग्नापूर्वी १ वर्ष आगोदर नोकरी करत होती व ती सोडलेली आहे, असे दिसून येते.

१८. सामनेवाला यांनी भिस्त ठेवलेल्या आदरणीय दिल्ली उच्च न्यायालय यांचा वर नमुद केलेला दामनप्रित कौर या न्यायनिवाडयाचे अवलोकन करता त्यामधील अर्जदाराने मुलाचा जन्म झाल्यानंतर नोकरी सोडल्याचे कथन दिसून येत आहे. यावरून सदर

न्यायनिवाडयातील अर्जदार लग्नानंतरही नोकरी करत होती, असे दिसून येते. याउलट, प्रस्तूत अर्जदार ही लग्नापूर्वी नोकरी करत होती. ती लग्नानंतर तसेच विभक्त झाल्यानंतर नोकरी करत असल्याबाबत पटलावर आलेले नाही. त्यामुळे प्रस्तूत न्यायनिवाडयातील गृहीतक या प्रकरणी लागू होत नाही. सामनेवाला यांनी अर्जदार ही लग्नानंतर अथवा विभक्त झाल्यानंतर नोकरी करत असल्याबाबत पटलावर आलेले नसल्याने आदरणीय सर्वोच्च न्यायालय यांचा सुनिता कचवाह या न्यायनिवाडयातील गृहीतकाप्रमाणे अर्जदार ही जरी उच्चशिक्षीत असली तरी ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे, असे म्हणता येणार नाही.

१९. अर्जदार हिने सामनेवाल क्र.२ यास प्रतिमहा ६० हजार रूपये पगार मिळत असल्याचे कथन केले आहे. याउलट, सामनेवालाने त्यास ३० हजार रूपये एवढेच प्रतिमहा उत्पन्न मिळत असल्याबाबत त्याने निशाणी २२ वर दाखल केलेल्या मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्रात नमुद केलेले आहे. तसेच त्याकरिता त्याचे बँक खात्याचे विवरणपत्राची छायांकीत प्रत दाखल केलेली आहे. अर्जदार हीने सदर बँकेचे माहितगार इसम यांना साक्षीसमन्स काढून सामनेवाला क्र. २ याचे बँक खात्याचे विवरण पत्राची साक्षांकीत प्रत दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन करता सामनेवाला यास प्रतिमहा ५० हजारापेक्षा जास्त पगार मिळत असल्याचे व काही महिन्यात त्यास ७५ हजारांपेक्षा जास्त पगार मिळाल्याचे दिसून येते. यावरून सामनेवाला यास निश्चितच प्रतिमहा ५० हजारांपेक्षा जास्त उत्पन्न मिळते.

२०. सामनेवाले यांचे कथनावरुन सामनेवाला क्र.२ याच्यावर त्याच्या आईची जबाबदारी आहे. सामनेवाला क्र. ३ नोकरी करत असल्याबाबत सामनेवाला यांनी नाकारलेले नाही. त्यामुळे सामनेवाला क्र. १ हीस सामनेवाला क्र. २ व ३ यांची पालन

पोषण करण्याची जबाबदारी आहे. सामनेवाला यांचे पुणे येथे दोन घरे आहेत. तसेच सामनेवाला क्र. २ याने स्वतःहून अर्जदार हीस विमानाने फिरायला घेवून गेल्याचे कथन केले आहे. सामनेवाला क्र. २ यांचे कामाचे व पगाराचे स्वरुप पाहता उभयपक्षकार एकत्र राहत असताना त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उत्तम असल्याचे दिसून येते.

२१. अर्जदार हिस कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. याउलट, सामनेवाला क्र.२ यास प्रतिमहा ५० हजारांपेक्षा जास्त पगार मिळतो. सामनेवाला क्र. ३ हा देखील नोकरी करतो व सामनेवाला क्र. १ यांचे जबाबदारीस हातभार लावतात. अर्जदार हिने प्रतिमहा २५ हजार रुपये अंतरिम पोटगीची मागणी केलेली आहे. उभयपक्षकार यांचे राहणीमानाचा दर्जा तसेच उत्पन्न याचा विचार करता अर्जदार हिने मागणी केलेली रक्कम अवास्तव असल्याचे दिसून येते. परंतू, उभयपक्षकार यांच्या राहणीमानाचा दर्जा व उत्पन्न यावरुन अर्जदार हीस प्रतिमहा १५,०००/– रुपये अंतरिम पोटगी देणे न्यायोचित होईल. करीता मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी, मुद्दा क्र. २ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र. ३ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. अर्ज अंशतः अर्जासह मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.२ याने अर्जदार हिस दरमहा रक्क्म रु.१५,०००/–(रुपये पंधरा हजार मात्र) प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून देण्यात यावे.

३. सामनेवाला यांना आदेशित करण्यात येते की, वरीलप्रमाणे अंतरिम पोटगी दर महिन्याच्या ११ तारखेच्या आत अर्जदारास देण्यात यावी.

४. प्रस्तुत अर्जाचा खर्च मुळ अर्जात समाविष्ट करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NIVAS KRISHNA KHARADE
Date: 2024.05.24 11:29:47 +0530

**(एन.के. खराडे)**

दि. २१.०५.२०२४

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

न्यायालय क्र.२, श्रीरामपूर.

**प्रमाणपत्र**

मी अशी खात्री देतो की सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत–

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | आंधळे आर. पी. (नि.श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नाव | : | श्री.एन.के. खराडे<br>२ रे सह दिवाणी न्यायाधीश तथा<br>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,श्रीरामपूर |
| दिनांक | : | २१.०५.२०२४ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | : | २४.०५.२०२४ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : | २४.०५.२०२४ |